**कडी-१ (नव्या पद्धतीची कडी)**

चित्र पाहण्याकरता येथे क्लिक करा - **कडी-१ (नव्या पद्धतीची कडी)**

**नोंदीत दिलेल्या पर्यायी शब्दांचा क्रम हा त्यांच्या एकूण सर्वेक्षणातील वारंवारितेनुसार दिलेला आहे याची नोंद घ्यावी.**

'नव्या पद्धतीच्या दारांना लावायची कडी' या संकल्पनेसाठी संपूर्ण महाराष्ट्रात **कडी**, **कडीकोयंडा** हे शब्द सर्वसाधारणपणे आढळून येतात.

यामध्ये भौगोलिक तसेच ध्वनिवैविध्यानुसार पुढीलप्रमाणे शब्द आढळून येतात. कडी, कोडी, करी, कळी, करची, कडची, कडीकोयंडा, कडीकोंडा, कडीकोंडका, क्वायंडा, कोयंडा, कोंडा, कोंडो, कोंडे, कोंडका, कोएंडा, कवडकोंडा, कडोकोंडो, खोन्ड्या, साखळ, साकळी, साखळी, संकल, संकळी, साखरी, साक्री, साकडी, साकयी, साकळीकोंडा, साकरकोंडा, कुलाबा, कुलाबी, कुलापा, कुलूप, कोंडी, कुंडी, गुंडी, आडना, आडणी, आडकी, अडेगळी, आडकाना, आडनो, आढो, आडनीन, अडाव, आडची, हॅन्डल, हान्ड्राप, इंगल, इंगळ, हंगल, ड्रप, दांडू, किली, खिली, खिळी, खीळ, खिल्ली, खिटी, कब्जी, काब्जा, सटकनी, टुचूकनी, टीचूकनी, टीचकनी, बिजागरी, बिजागडी, बिजाक्री, टापरा, किलीप, सडा, चावी, हुक, शटल, इंजीस, गुजर, लाक, लॉक इत्यादी.

कडीच्या वेगवेगळ्या प्रकारांमुळे, कडी ज्या साहित्यापासून तयार होते त्या साहित्याच्या नावावरून या संकल्पनेतसुद्धा वैविध्य आढळते. साखळी, खिळी, हुक यांचा वापर केलेली कडी, तर इंग्रजीच्या प्रभावाने लॉक, हंड्ल, इंजेस यांचा वापर दिसून येतो.

या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्सच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० आंतरराष्ट्रीय या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल.
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/